CMYK

महार चिकना परिसरात मुसळधार पावसामुळे पिके पिवळी पडु लागली >>पान 2

कोकाटे यांनी शेतकरी भिकारी नाही शासन भिकारी आहे असं बोलू नये >>पान 3

लोणार तालुक्यात अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश्य पाऊस; भुमराळा गावातही पावसाचा कहर >>पान 4


# दैनिक आपला विदर्भ





टू मच विथ काजोल अँन्ड ट्विंकल ९०च्या दशकातील सुंदर अभिनेत्री त्याच्या नवीन अनस्क्रिप्टेड शोनं घालतील धुमाकूळ...

आतील पान

**सुविचार**
आपल्या जीवनात शांतता राखा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 04 ■ बुधवार, दि. 23 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## देवेंद्र फडणवीसांच्या कामाची गती आणि झपाटा कौतुकास्पद : शरद पवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचा झपाटा आणि उरक पाहून मला माझा पहिला मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ आठवतो. ही गती त्यांनी माझ्या वयापर्यंत कायम ठेवावी आणि ती आणखी वृद्धिंगत होत राहावी, अशी शुभेच्छा त्यांच्या वाढदिवसानिमित्त देतो'', असे म्हणत ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी फडणवीस यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र नायक' हे कॉफी टेबल बुक प्रकाशित झाले. या पुस्तकात शरद पवार यांनी लिहिलेल्या लेखात फडणवीस यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले आहे. पवार यांनी आपल्या लेखात म्हटले आहे, ''क्रियाशील राहण्यासाठी प्रकृती तंदुरुस्त हवी, पण फडणवीस यांच्या कार्यक्षमतेत स्थूलपणा कधीच आडवा आला नाही. त्यांचे कष्ट पाहून ते थकत कसे नाहीत, हा प्रश्न मलाही पडतो. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. राजकारणाचे बाळकडू त्यांना घरातून मिळाले असले, तरी वडिलांच्या अकाली निधनाचा धक्का पचवून त्यांनी स्वत:ला सावरले आणि नेटाने पुढे गेले. त्यांच्या यशस्वी वाटचालीचे श्रेय त्यांनाच जाते.''

ते पुढे म्हणाले, ''कायद्याचे पदवीधर असल्याने फडणवीस हजरजबाबी आणि संवादकुशल आहेत. वागण्या-बोलण्यात तारतम्य हा त्यांचा खास गुण आहे. उपजत बुद्धिमत्ता आणि या गुणांच्या जोरावर त्यांनी सत्तेत नसतानाही आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमटवला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय होती. त्यामुळेच तरुण वयात त्यांना मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी मिळाली. भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाचा विश्वास त्यांनी सार्थ ठरवला. विविध विषयांची सखोल जाण, प्रशासनावर मजबूत पकड आणि आधुनिकतेची कास धरणारा नेता म्हणून मी त्यांच्याकडे पाहतो.''



माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या लेखाचाही त्यात समावेश आहे. ''महाराष्ट्राच्या राजकारणात गंगाधरराव फडणवीस यांनी आदर्श राजकारणी म्हणून ठसा उमटवला. हा वारसा देवेंद्र फडणवीस समर्थपणे आणि मेहनतीने पुढे नेत आहेत. २०१४-२०१९ या काळात आम्ही एकत्र काम केले, तेव्हा त्यांची विषय समजून घेण्याची जिद्द, प्रश्न सोडवण्याची तळमळ आणि राज्याला न्याय देण्याचा प्रयत्न जवळून अनुभवला. विरोधी पक्षनेता म्हणूनही त्यांची धडपड लक्षणीय होती. देवेंद्र फडणवीस हे हुशार आणि प्रामाणिक राजकारणी आहेत. अडचणींना त्यांनी अभ्यासू आणि मुत्सद्दी स्वभावाने तोंड दिले. 'मेक इन महाराष्ट्र' आणि 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' यांसारख्या योजनांमुळे महाराष्ट्राने औद्योगिक व आर्थिक प्रगती साधली. या यशाने त्यांची पक्षातील विश्वासार्हता वाढली. फडणवीस यांची भाजपमधील प्रतिमा गतिमान, अभ्यासू आणि पक्षनिष्ठ नेत्याची आहे. आर्थिक-सामाजिक धोरणांचे यश, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जवळीक आणि केंद्रीय नेतृत्वाचा पाठिंबा यामुळे त्यांचे स्थान दृढ आहे. भविष्यात राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्या मनातील योजनांना यश मिळो, ही शुभेच्छा!'', असे ठाकरे यांनी लेखात म्हटले आहे.

## शेतकऱ्यांसाठी मोठी अपडेट! उसाच्या एफआरपी बाबत केंद्र सरकारकडून नवीन परीपत्रक जारी

**मुंबई/प्रतिनिधी :** साखर गळीत हंगामाच्या संदर्भात केंद्र सरकारने नुकतेच एक नवीन परिपत्रक जारी केले असून, त्यानुसार आता कारखान्यांचा साखर उतारा म्हणजेच रिकव्हरी, हंगामाच्या शेवटी निश्चित केला जाणार आहे. परिणामी, उसाचे पैसे म्हणजेच एफआरपी शेतकऱ्यांना गाळपानंतर १४ दिवसांत देणे जवळपास अशक्य होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

या परिपत्रकात म्हटले आहे की, एफआरपी निश्चित करताना चालू हंगामातीलच साखर उतारा गृहीत धरावा. मात्र, साखर उतारा हा प्रत्यक्षात हंगाम संपल्यानंतरच निश्चित होतो. यामुळे एफआरपी देखील हंगामानंतरच निश्चित केली जाईल. याआधी मागील हंगामाच्या सरासरी साखर उताऱ्यावर आधारित दर गळीत हंगामाच्या सुरुवातीपासून शेतकऱ्यांना दिला जात होता. पण आता त्यात बदल होणार आहे. उसाच्या एफआरपीसंदर्भातील कायद्यानुसार, गाळप झाल्यानंतर १४ दिवसांच्या आत शेतकऱ्यांना पैसे देणे बंधनकारक आहे. मात्र, आता एफआरपीच जर हंगाम संपल्यावर ठरणार असेल, तर त्या कालमर्यादेत पैसे कसे देता येणार, हा कायदेशीर पेच निर्माण झाला आहे.

यामुळे एफआरपी देण्याची प्रक्रिया लांबणीवर पडण्याची शक्यता असून, यावरून साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनांमध्ये संघर्ष उफाळण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

साखर कारखानदार मागील काही वर्षांपासून मागणी करत होते की, एफआरपी ही चालू वर्षातील प्रत्यक्ष साखर उताऱ्यावर आधारित असावी. अखेर केंद्र सरकारने त्यांची ही मागणी मान्य केली आहे. १० जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाने फेडरेशनचे कार्यकारी संचालक संजय खताळ यांना याबाबत अधिकृत पत्र केंद्र सरकारने पाठवले आहे.

शेतकरी संघटनांची प्रतिक्रिया

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विजय रणदिवे यांनी या निर्णयावर टीका करताना सांगितले, ''दूध उत्पादनामध्ये जसा फॅट तपासून दर दिला जातो, तसा ऊस उत्पादनात रिकव्हरी तपासून दर द्यावा. पण अनेक साखर कारखान्यांत ऊसाची बांधावर रिकव्हरी तपासलीच जात नाही. त्यामुळे साखर उताऱ्यावर परिणाम होतो. आम्ही आग्रह धरतो की बांधावरच रिकव्हरी तपासली जावी.'' हा निर्णय साखर कारखानदारांसाठी जरी फायदेशीर ठरत असला, तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनिश्चितता आणि अडचणी निर्माण करणारा आहे. गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वीच एफआरपी ठरावी अशी शेतकऱ्यांची मागणी असून, याबाबत स्पष्ट मार्गदर्शन आणि कायद्यातील सुस्पष्टता आवश्यक बनली आहे.

## कोकाटे यांच्या अंगावर पत्ते उधळण्याचा उबाठा गटाकडून प्रयत्न, तीन कार्यकर्ते पोलिसांच्या ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आज नाशिकमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे जात असताना, उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होऊन त्यांच्या ताफ्यावर पत्ते उधळण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत संबंधित कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडिओ गेल्या दोन दिवसांपासून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यावर विरोधकांकडून चांगलेच तोंडसुख घेतले जात असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. आज सकाळी नाशिक रोड येथील अनुराधा चौकात आयोजित कार्यक्रमात कोकाटे जात असताना त्यांच्या ताफ्यावर पत्ते उधळण्याचा प्रयत्न करण्यात आला. या निषेधात्म क कृतीत उबाठाचे उपजिल्हाप्रमुख भैया मणियार, योगेश देशमुख आणि निलेश शिरसाठ यांनी सहभाग घेतला होता. या तिघांनी कृषी मंत्री कोकाटे यांना निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याच वेळी त्यांनी कोकाटे यांच्या अंगावर पत्ते उधळण्याचा प्रयत्न करून वातावरण तापवले. दरम्यान पोलिसांनी तत्काळ तिथे येऊन या तिघांना ताब्यात घेतले.

सदर प्रकरण आणखीन चिघळू नये तसेच, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## वसईच्या कळंब समुद्र किनारी आढळला संशयास्पद कंटेनर; पोलिसांकडून तपास सुरु

**नालासोपारा/प्रतिनिधी :** वसई पश्चिमेच्या कळंब समुद्र किनारी एक संशयास्पद कंटेनर वाहून आल्याचे आढळून आला आहे. मंगळवारी सकाळी समुद्र किनारी गेलेल्या नागरिकांना बेवारस स्थितीत समुद्राच्या लाटांत घंटागळ्या खात असलेला हा कंटनेर दिसून आल्याने हा प्रकार उघड झाला आहे. पोलिसांकडून याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

वसई पश्चिमेच्या कळंब समुद्रकिनाऱ्यावर, मोठ्या संख्येने पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. मंगळवारी सकाळी या समुद्रकिनाऱ्यावर एक मोठा कंटनेर वाहून आल्याचे नागरिकांना दिसून आले. या घटनेमुळे खळबळ उडाली. नागरिकांनी याची माहिती तात्काळ नालासोपारा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कंटेनर बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

या कंटनेर पाहण्यासाठी नागरिकांनी समुद्र किनाऱ्यावर गर्दी केली आहे. हा कंटेंनर एखाद्या म ालवाहतूक करणाऱ्या जहाजातून पडला असावा असा अंदाज वर्तविला जात आहे.

## एसटी अन् दुचाकीचा भीषण अपघात, २ जण ठार; भरधाव बसने दुचाकीला फरफटत नेले

**परभणी/प्रतिनिधी :** राज्यातील अपघातांच्या घटनांची मालिका कमी होताना दिसून येत नाही. त्यात, महामंडळाच्या एसटी बसच्याही अपघाताच्या घटना सातत्याने घडत आहेत. आता, परभणी जिल्ह्यात एसटी बस आणि दुचाकीचा अपघात होऊन दोघांचा मूत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. परभणीच्या पाथरी-सोनपेठ मार्गावरील जैतापूर वाडीजवळ आज बस आणि दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दोघे जण जागीच ठार झाल्याची घटना घडली असून हा अपघात एवढा भीषण होता की दुचाकी ही बसच्या समोरील भागात अडकून अनेक फूट फरफटत गेल्याचं पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे अपघातानंतर एसटी बस थेट शेतात जाऊन थांबली होती. एस.टी. महामंडळ पाथरी आगाराची बस सकाळी पाथरीहून सोनपेठच्या दिशेने जात होती. पाथरी सोनपेठ रस्त्यावर जैतापूर वाडीजवळ या बसला अपघात झाला. त्यावेळी समोरून पाथरीकडे येणाऱ्या दुचाकी क्र. एम. एच. २२ ए.के. १५८३ आणि बस क्र. एम. एच. ०६ एस ८७९० ची जोरदार धडक झाल्याने दुचाकीवरील लतिफ अहमद पठाण (वय ५६) आणि शेख अनवर शेख नूर (वय ३९ वर्षे) राहणार इंदिरानगर हे दोघेही जागीच ठार झाले आहेत.


## जिल्हयातील ८ मंडळात ढगफुटीसदृश्य पाऊस नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

### केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले निर्देश

**बुलढाणा/विशेष प्रतिनिधी** :२१ जुलै रोजी बुलढाणा जिल्हयातील ८ मंडळ क्षेत्रामध्ये ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये घरांचे आणि शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. झालेल्या नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहे.

बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील २१ जुलै ला ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे नदि नाले तुडूंब भरुन वाहु लागले. पावसाचे पाणी घरात शिरल्यामुळे अनेक कुटूंबांच्या घरांचे व घरातील सामानांचे नुकसान झाले आहे. तर शेतजमिनही खरडुन गेले आहे. २१ जुलै ला लोणार येथे १७१.८ मि.मि., टिटवी येथे १५४.५ मि.मि., हिरडव येथे १८४.५ मि.मि., शेगांव तालुक्यातील जवळा १७७.३ मि.मि., खामगांव तालुक्यातील पळशी येथे १५१ मि.मि. पावसाची नोंद २१ जुलै च्या मध्यरात्री झाली आहे. त्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये शेतजमिनीचे आणि घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या शेतजमिनीचे कृषी विभाग, महसुल विभाग आणि पिक विमा कंपनीच्या प्रतिनीधी समवेत तात्काळ पंचनामे करण्यासंदर्भात आपल्या



स्तरावरुन संबधित विभागांना निर्देशित कराव्यात अशा सुचना जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आल्या आहे.

## लोणार व शेगाव तालुक्यात ढगफुटीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून भरपाई द्या-रविकांत तुपकर

- ➤ रविकांत तुपकर यांची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन
- ➤ क्रांतिकारी च्या पदाधिकाऱ्यांनी केली नुकसानीची पाहणी..

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील लोणार व शेगाव या दोन तालुक्यांमध्ये पावसाने कहर केला आहे. या ढगफुटीमुळे शेतीचे आणि पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. घरांचेही नुकसान झाले आहे,सदर नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना शंभर टक्के नुकसान भरपाई विनाअट द्यावी अशी मागणी युवा नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे या संदर्भात आज २२ जुलै रोजी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.तर दुसरीकडे क्रांतिकारी चे नेते सहदेव लाड व इतर पदाधिकाऱ्यांनी शेतावर जाऊन पाहणी केली व नुकसान ग्रस्ताना धिर दिला.

जिल्ह्यात एकीकडे अद्यापही जोरदार पावसाची प्रतिक्षा आहे तर दुसरीकडे काही भागात मुसळधार पावसाने, ढगफुटीने थैमान घातले आहे. २१ जुलै च्या रात्री व २२ जुलै च्या सकाळी लोणार व शेगाव तालुक्यात ढगफुटी सदृष पाऊस झाला. नदी- नाले आपले पात्र सोडून वाहू लागले. या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणच्या शेतजमिनी खरडून गेल्या. काही शेतांमधील पिके वाहून गेली तर काही शेतांना तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या अधिवृष्टीमुळे लोणार तालुक्यातील आरडव,वढव, हिरडव, गुंधा, गुंजखेड, चिंचोली सांगळे, पारडा दराडे, देऊळगाव कुंडपाळ, पांगरा डोळे, टिटवी, नांद्रा




तसेच शेगाव तालुक्यातील नागझरी टाकळी, तिंत्रव, जवळा वरखेड, हिंगणा हुई यासह इतर गावांमध्ये शेतीचे आणि पिकांचे प्रचंड असे नुकसान झाले आहे त्यामुळे काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकट आहे तर काही ठिकाणी दुबार पेरणी देखील करण्यायोग्य जमीन राहिली नाही, त्यामुळे या दोन तालुक्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले आहेत. आधीच शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज काढून पेरणी केली होती त्यात आता पुन्हा अतिवृष्टीचे संकट ओढवले आहे.

यामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहेत. अशावेळी शेतकऱ्यांना तातडीने आधार देण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने तातडीने सर्व नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना शंभर टक्के विनाअट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे. दरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी सहदेव लाड व इतर कार्यकर्त्यांनी लोणार तालुक्यातील अतिवृष्टभागाची पाहणी करून रविकांत तुपकर यांच्याकडे आढावा मांडला.

CMYK

## सायबर गुन्हेगारांचे अदृश्य चेहरे

सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ऍक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो. सायबर गुन्हेगार ज्यांचे जास्त फॅन फॉलोअर्स असतील अशा तरुणांना स्टार्टअप कंपनी आपल्या प्रोडक्टच्या जाहिराती करण्यासाठी संपर्क करतात त्यातही या सायबर गुन्हेगारांचे लक्ष तरुण मुलींवर अधिक असते. सुंदर आणि जास्त फॅन फॉलोअर्स असणाऱ्या तरुण मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी सायबर गुन्हेगार आपण मोठ्या कंपनीतून बोलत असून या मुलींचे फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील रिल्स आणि व्हिडिओ पाहून संपर्क केल्याचे सांगतात. मुलींचा व्हिडीओ कंपनीला आवडला असून तुम्हाला आमच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी जाहिरात करण्यासाठी निवडले असल्याचे सांगून आणखी व्हिडीओ आणि रिल्स पाठवण्यास सांगतात. बहुतेक वेळा असा संपर्क ईमेल द्वारे केला जातो. मुलीही जणू आपण मॉडेल बनलो आहोत अशा आविर्भात त्यांनी सांगितल्याप्रमाणे व्हिडीओ पाठवतात व इथेच फसतात. व्हिडिओ पाठवल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या मुलींना मेल येतो हा मेल त्यांचाच मॉर्फ केलेला व्हिडिओ असतो. तो व्हिडिओ मॉर्फ करून अश्लील बनवलेला असतो. हा व्हिडीओ पाठवून मुलींना ब्लॅकमेल केले जाते. हे अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींकडे पैशांची मागणी केली जाते. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्या मुली पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेतात मात्र ज्यांना पैसे देणे शक्य होत नाही त्या मुली बदनामीच्या भीतीने स्वतःच आयुष्य संपवून टाकतात . आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आव्हान केले जातेतरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलीकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे त्यामुळे सोशल मीडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगारांची ही टोळी आपली सोशल मीडियामध्ये आपण टाकत असलेल्या पोस्टवरुन आपली मानसिकता ओळखून पद्धतशीरपणे जाळे टाकतात व फसवतात त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट टाकताना काळजी घ्यावी. सोशल मीडियावर ओळखीच्याच लोकांना फॉलो करावे. अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. अनोळखी लोकांच्या मेल आणि फोन कॉलला उत्तर देऊ नये. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक बाबी सोशल मीडियावर टाकू नये. सोशल मीडियावर वावरताना जर सतर्क राहिले नाही तर सायबर गुन्हेगारांचे हे अदृश्य चेहरे आपल्याला घेरण्यास टपून बसलेलेच आहेत याची जाणीव सोशल मीडिया वापरणाऱ्या सर्व तरूणांनी ठेवावी.

# महार चिकना परिसरात मुसळधार पावसामुळे पिके पिवळी पडु लागली

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अशोक मुंढे**

**महार चिकना :** लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळातील महार चिकना, खापरखेड, खळेगाव, सोमठाणा, कारेगाव, ब्राह्मण चिकना तसेच इतरही परिसरात दिनांक २१ रोजी रात्री सतत धार पावसाने नदी नाले दुथडी भरून गेली दिनांक २६ जून रोजी झालेल्या पावसाने शेतकरी सावरतो ना सावरतो तोच रात्री झालेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्याची पिक पिवळे पडू लागले तसेच सतत धार असलेल्या पावसामुळे सोयाबीन पिकांची मुळ्या सडून पीक पिवळे पडत आहे कापूस मुग उडीद या पिकास सुद्धा अशीच परिस्थिती आहे त्यामुळे यावर्षी सोयाबीन कापूस या पिकात उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट येणार आहे असे दिसते




शेतात एवढ्या मोलामागाचे खत बियाणे पेरून जर सोयाबीन कापूस पिवळी पडत असेल तर शेतकरी बांधवांनी आपल्या मुलांचे शिक्षण, मुलांचे लग्न तसेच दवाखान्यांची खर्च व ईतरही खर्च कसे भागवायचे हा त्यांच्यापुढे खूप मोठा पेच आहे तसेच दिनांक २६ रोजी झालेल्या पावसाने बऱ्यापैकी जमिनी खरडुण गेल्या काहींच्या विहीरी खचल्या त्या जमिनीचा काय मोबदला भेटणार आहे हे सुद्धा शेतकऱ्यांना अजून कळाले नाही भेटणार तर किती भेटणार हे सुद्धा माहिती नाही बरेच नेतेमंडळींनी शेतकऱ्याच्या बांधावर येऊन पीक नुकसानीची पाहणी केली शेतकऱ्यांचे सांत्वन केले पण अद्याप पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी त्यांच्याकडून होत आहे

या वर्षी निसर्गाने तर कहरच केला. २६ जून ला महारचिकना शिवारात ढग फुटी सदृश्य पाऊस झाला. त्या मध्ये शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले. त्या मध्ये आमची गट नंबर १७० मधील विहीर खचली. त्या विहिरीचा अद्यापपर्यंत पंचनामा काही झाला नाही. तलाठी कृषी अधिकारी ग्रामसेवक विहिरीवर आले त्यांनी फक्त फोटो काढले व इंजिनीअर ला तुम्ही बोलवा व कोरा पंचनामा दिला. पंचनामा करून घ्या. शेतकऱ्याचे काम आहे का ते.व त्यावर जखम म्हणून निसर्गाने परत एकदा ढग फुटी सदृश्य पाऊस पडून राहिले सुहीले पीक नष्ट करून टाकले.सरकार ला माझी एकच मागणी आहे की पिकाचे सरसगट पंचनामे केले परंतु अध्यापपर्यंत मदत जाहीर केली नाही. ती तात्काळ जाहीर करावी. म्हणजे शेतकऱ्यांचे थोडे समाधान होईल.

**–दिपक घुगे**
**नुकसान ग्रस्त शेतकरी**
**महारचिकना**

## टू मच विथ काजोल ॲन्ड ट्विंकल ९०च्या दशकातील सुंदर अभिनेत्री त्याच्या नवीन अनस्क्रिप्टेड शोनं घालतील धुमाकूळ.

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडच्या दोन सुंदर अभिनेत्री काजोल आणि ट्विंकल खन्ना एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत, चित्रपटासाठी नाही तर एका नवीन टॉक शोसाठी. प्राइम व्हिडिओ इंडियानं आज, २२ जुलै रोजी टू मच विथ काजोल अँड ट्विंकल या नवीन टॉक शोची अधिकृत घोषणा केली आहे, ज्याचं सूत्रसंचालन काजोल आणि ट्विंकल खन्ना करणार आहेत. प्राइम व्हिडिओनं मंगळवारी टू मच विथ काजोल ॲन्ड ट्विंकलचे पोस्टर रिलीज करून आपल्या शोची घोषणा केली. या आगामी टॉक शोची निर्मिती बनिजय एशिया करत आहे. टू मच विथ काजोल ॲन्ड ट्विंकल शोमध्ये हास्य आणि भाष्य आणि बरेच काही असेल. शोचे पोस्टर रिलीज करताना निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं आहे की, त्यांच्याजवळ चहा आहे आणि त्याची खूप आठवण येत आहे. टू मच विथ काजोल ॲन्ड ट्विंकल लवकरच येत आहे. या टॉक शोमध्ये बॉलिवूडमधील अनेक मोठी नावे आणि मनोरंजन जगतातील सेलिब्रिटी सहभागी होईल अशी देखील चर्चा आहे.

## दुर्दैव! सुप्रसिद्ध अभिनेत्याचा खोल समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू; सिनेसृष्टीवर कोसळला दु:खाचा डोंगर

**मुंबई/प्रतिनिधी :** टेलिव्हिजन शोमधून जगभरात पोहोचलेला प्रसिद्ध अभिनेता मॅलकॉम-जमाल वार्नरचं वयाच्या ५४व्या वर्षी निधन झालं आहे. अभिनेता कोस्टा रिका देशातील समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेला होता. त्याचवेळी तो समुद्रात बुडाला आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे मॅलकॉमच्या चाहत्यांना आणि सिनेइंडस्ट्रीतील कलाकारांना मोठा धक्का बसला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, कोस्टा रिकाच्या कॅरिबियन किनाऱ्यावरील एका समुद्रकिनाऱ्यावर रविवारी दुपारी वॉर्नर बुडाला. अभिनेता व्हेकेशन एन्जॉय करण्यासाठी कोस्टा रिकाला गेला होता. त्याचवेळी तो पोहण्यासाठी समुद्रात गेला, पण पाण्याचा अंदाज न आल्यानं तो खोल समुद्रात बुडाला.

तपास विभागानं त्यांच्या अहवालात नमूद केलेल्या माहितीनुसार, अभिनेता मॅलकॉम आपल्या फॅमिलीसोबत कोस्टा रिकामधील कोक्लेस बीचवर गेला होता. समुद्रकिनाऱ्यावर फिरताना तो खोल समुद्रात गेला. तिथे तो लाटांच्या प्रवाहात अडकला. तिथून त्याला बाहेर येणं अशक्य झालं होतं. काही वेळातच त्याला बचाव पथकानं बाहेर काढलं आणि तात्काळ रुग्णालयात दाखल केलं. पण, तोपर्यंत फार उशीर झालेला. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

मॅलकॉम-जमाल वार्नरनं १९८४ ते १९९२ दरम्यान चाललेल्या प्रसिद्ध अमेरिकन सिटकॉम 'द कॉस्बी शो' मध्ये थिओ हक्स्टेबल ही व्यक्तिरेखा साकारली होती. या भूमिकेमुळे मॅलकॉमला जगभरात प्रसिद्धी मिळाली. ४० वर्षांच्या कारकिर्दीत दिग्गज अभिनेत्यानं टीव्ही शो आणि संगीत व्हिडीओंचे दिग्दर्शनही केलं आहे. तसेच, अनेक सिटकॉममध्येही काम केलं. त्यानं 'माल्कम अँड एडी' आणि 'रीड बिटवीन द लाईन्स' आणि 'द रेसिडेंट' या वैद्यकीय नाटकांमध्ये काम केलं आहे.

सर्वोत्कृष्ट पारंपारिक 'आर अँड बी' परफॉर्मन्ससाठी ग्रॅमी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. 'हायडिंग इन प्लेन व्ह्यू' या अल्बमसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट स्पोकन वर्ड पोएट्री अल्बमसाठी ग्रॅमी नामांकन देखील मिळालं.

## जगदीप धनखड यांचा राजीनामा, उपराष्ट्रपतींची निवड कशी होते? निवडणूक झाल्यास मतदान कोण करतं?

नवी दिल्ली : जगदीप धनखड यांनी काल प्रकृती आणि वैद्यकीय कारणांचा हवाला देत उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जगदीप धनखड यांचा राजीनामा स्वीकारला आहे. यामुळं आता भारतीय संविधानाच्या कलम ६८ नुसार नव्या उपराष्ट्रपतींच्या निवडीची प्रक्रिया सुरु होईल. उपराष्ट्रपतींची निवड प्रक्रिया कशी होते ते जाणून घेणं महत्त्वाचं आहे. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. जगदीप धनखड यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये व्यंकय्या नायडू यांच्यानंतर उपराष्ट्रपती पद स्वीकारलं होतं. कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी राजीनामा देणारे जगदीप धनखड हे तिसरे उपराष्ट्रपती ठरले आहेत.



संविधानाच्या कलम ६८ नुसार उपराष्ट्रपती पद निवडीची प्रक्रिया आहे. कलम ६८ (१) नुसार उपराष्ट्रपतींचा कार्यकाळ संपंत आला अशेल तर त्यापूर्वी नव्या उपराष्ट्रपतींच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाते. दुसरी तरतदू अशी आहे जर उपराष्ट्रपती पद मृत्यू, राजीनामा, पदावरुन हटवलं गेल्यानं रिक्त झाल्यास नव्या उपराष्ट्रपतींची नियुक्ती प्रक्रियेद्वारे केली जाते. उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा संविधानात दिलेली नाही. कलम ६८ नुसार जितक्या लवकर उपराष्ट्रपतींची निवड करणं शक्य आहे तितक्या लवकर ती करावी. जगदीप धनखड यांनी ३ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला होता, त्यांची अजून दोन वर्ष बाकी होती. मात्र, नव्या उपराष्ट्रपतींची निवड झाल्यानंतर ती पाच वर्षांसाठी असते.

उपराष्ट्रपती होण्यासाठी पात्रता

भारतीय संविधानाच्या कलम ६६(३) अनुसार उपराष्ट्रपतीपदाच्या उमेदवारासाठी काही पात्रता निश्चित करण्यात आल्या आहेत. संबंधित व्यक्ती भारताचा नागरिक असला पाहिजे. त्यानं वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत. तो राज्यसभेवर निवडून येण्यास पात्र असावा. भारत सरकार, कोणतंही राज्य सरकार किंवा इतर शासकीय प्राधिकरणात लाभाच्या पदावर नसावा.

उपराष्ट्रपतींची निवडणूक प्रक्रिया निवडणूक आयोगाकडून राबवली जाते. आयोगाकडून निवडणुकीची अधिसूचना काढली जाते. उमेदवारी अर्जांची छाननी केली जाते. मतदान केलं जातं. त्यानंतर मतमोजणी करुन निकाल जाहीर केला जातो.

उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीत एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार (संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य मिळून बनलेल्या निर्वाचक गणाच्या सदस्यांकडून निवडला जाईल) या निवडणुकीतील मतदान गुप्त मतदान पद्धतीनं केलं जातं.

उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांकडून मतदान केलं जातं. लोकसभा आणि राज्यसभेतील राष्ट्रपतींकडून नाम निर्देशित केलेले सदस्य देखील यात मतदान करु शकतात. मतदारांना उमेदवारांच्या नावापुढं पसंतीक्रम नोंदवायचा असतो. जोपर्यंत उमेदवार बहुमतानं विजयी होत नाही तोपर्यंत मतमोजणी केली जाते.

# सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना; ३१ जुलैपर्यंत सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना यावर्षीच्या खरीप हंगामापासून लागू करण्यात आलेली आहे. सुधारित पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासनाने जारी केल्या आहेत. सुधारित पिक विमा योजनामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या कृषी कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन कृषि उपसंचालक संजीवनी कणखर यांनी केले आहे.

जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२५ व रब्बी २०२५-२६ हंगामकरिता (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र धरून राबवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून भारतीय कृषी विमा कंपनीची एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.

योजनचा उद्देश : नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, कृषि क्षेत्रासाठी पतपुरवठ्यात सातत्य राखणे, उत्पादनातील जोखीम पासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबर अन्नसुरक्षा पिकांचे विविध कारण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल.

योजनेचे वैशिष्टे : सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे, अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामसाठी १.५० टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत खरीप २०५ व रब्बी २०२५-२६ हंगामकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसुचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षापैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षाची सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असेल. पिक विमा नुकसान भरपाईसाठी ई पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. बोगस पीकविमा प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. पीकविमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रधारकास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निश्चित केले असून विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्र धारकास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी केंद्रधारकास देऊ नये. योजनेअंतर्गत भात, सोयाबीन, कापूस व गहू या पिकाकरिता खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ करिता पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्राप्त तांत्रिक उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन विमा क्षेत्र घटकातील सरासरी उत्पादकता निश्चित करण्यात येईल.

योजने अंतर्गत खरीप व रब्बी हंगामा करिता पीक पेरणी पासून काढणीपर्यतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारे इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधारे किंवा तांत्रिक उत्पादन आधारे महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील.

पिक निहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर सोयाबीनसाठी ११६० रुपये, कपाशी ९०० रुपये, तुर ४७० रुपये, मका ९० रुपये, मुंग ७० रुपये, उडीद ६२.५०रुपये, ज्वारी ८२. ५० रुपये निश्चित केला आहे. अधिक माहितीसाठी https://pmfby.gov.in या वेबसाइटवर किंवा हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा आपल्या नजीकच्या सीएससी केंद्र, कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कोकाटे यांनी शेतकरी भिकारी नाही शासन भिकारी आहे असं बोलू नये

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कोकाटेंना सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** माणिकराव कोकाटे यांनी शेतकरी भिकारी नाही शासन भिकारी आहे. असं मंत्री महोदयांनी बोलू नये आणि बोलले असतील तर बोलू नये. माणिकराव कोकाटे बाबत निर्णय त्यांच्या पक्षाचे प्रमुख अजित पवार आहे आणि ते जे काही बोलणे याची वास्तविकता काय आणि वस्तू स्थिति काय आहे हे पाहतील. असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.ते वर्धा येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानानिमित्त आयोजित मोतीबिंदू, शस्त्रक्रिया हे शिबिर आयोजित केल्याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांचे अभिनंदन केले. यावेळी ते म्हणाले की, हे शिबिर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आले. खरं म्हणजे व्हिजनरी आणि अभ्यास व मुख्यमंत्री म्हणून ते काम करत आहे. अजित पवार यांचाही आज वाढदिवस आहे. त्यांनाही मी फोनवर शुभेच्छा दिल्या आहेत. अजित पवार देखील अतिशय शिस्तीने काम करणारे उपमुख्यमंत्री आहे. खऱ्या अर्थाने सगळ्या गोष्टी वेळ पाळणारे आणि वेळेवर उपस्थित राहणारे अतिशय शिस्तबद्ध अशा काम करणारे अजित पवार यांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा आणि पत्रकारांना सुद्धा मनापासून शुभेच्छा की तुम्ही जे दोघे डोळे वगैरे तपासायचे मोतीबिंदू शिबिरातून तपासवे.असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. माणिकराव कोकाटे यांचा जो काही प्रकार सुरू आहे.या बाबतीमध्ये कोकाटे यांनी देखील स्पष्टीकरण दिले आहे. आणि त्या बाबतीमध्ये योग्य ती पडताळणी होईल आणि दूध का दूध पाणी का पाणी होईल. शेतकरी आमचा अन्नदाता आहे. मायबाप आहे. बळीराजा हा कायम सुखी असावा. मी भाषणात बोललो की चांगला पाऊस येऊ दे पिक पिकू दे बळीराजा सुखी राहू दे नेहमी आम्ही बळीराजासाठी परमेश्वराकडे प्रार्थना



करत असतो.असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

# खडसेंनी स्वत:च्या मुलाला संपवल्याचा दावा प्रफुल लोढाने केला होता, गिरीश महाजनांनी जुनी आठवण सांगितली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात हनी ट्रॅपचे प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहे. या प्रकरणात प्रफुल लोढा या व्यक्तीचे नाव समोर आल्यानंतर राज्यभरात खळबळ उडाली आहे. यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी प्रफुल लोढा आणि मंत्री गिरीश महाजन यांचे जवळचे संबंध असल्याचा खळबळजनक दावा केला. हनी ट्रॅप प्रकरणाची एसआयटी चौकशी करायला हवी, अशी मागणी देखील एकनाथ खडसे यांनी केली आहे. खडसेंच्या आरोपावर प्रत्युत्तर देताना गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांच्या मुलाच्या निधनाबाबत मोठा दावा केलाय.

खडसे यांनी प्रफुल लोढा याचे नाव घेत गिरीश महाजन यांच्यावर आरोप केल्यानंतर महाजन यांनी पत्रकार परिषद घेत आरोप फेटाळले. गिरीश महाजन म्हणाले की, खडसे यांच्याबद्दल काय बोलावं. त्यांना सर्वदूर अपयश आलेलं आहे. ते सत्तेपासून दूर फेकले गेले आहेत. भाजपमध्ये येण्यासाठी त्यांनी लोटांगण घातले. मात्र त्यांना पक्षात कोणीही घेतले नाही. सर्व आजारपण आणि सर्वदूर अपयश यामुळे हा माणूस द्वेष भावनेने पछाडलेला आहे. मी एकनाथ खडसे यांच्यासोबतचे प्रफुल लोढा यांचेसुद्धा फोटो दाखवतो. एकनाथ खडसे यांची मानसिकता खराबच झालेली आहे.

निखिल खडसे यांनी ज्यावेळी आत्महत्या केली, त्यावेळी हाच प्रफुल लोढा बोलला होता. काय-काय बरगळला होता. आता खडसे म्हणतात प्रफुल लोढा यांची एसआयटी चौकशी करा. असे असेल तर निखिल खडसे यांच्या मृत्यूप्रकरणाचीही चौकशीचीही प्रफुल लोढा याने मागणी केली होती. एकनाथ खडसे यांच्या मुलाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला होता हे समोर आले पाहिजे. खडसेंनीच त्यांच्या मुलाचा खून केला, असे याच लोढाने सांगितलेले आहे. त्यावेळी मी एकनाथ खडसे यांच्यासोबतच राहत होतो. मला त्याबद्दल बोलायचं नाही. मी त्या लेव्हलचा माणूस नाही. पण त्यांनी बोलताना थोडं तारतम्य बाळागलं पाहिजे, अशी आठवण गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसेंना करून दिली.

एकनाथ खडसे म्हणाले होते की, महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी हनी ट्रॅपचे प्रकार घडायला लागलेले आहेत. नुकतंच नाशिकचं एक प्रकरण आलं होतं, ज्यात ७२ अधिकारी आणि काही लोकं अडकले आहेत, त्याची चौकशी सुरु आहे. दुसरं उदाहरण आता समोर आलं आहे, प्रफुल्ल लोढा म्हणून आमच्या जळगावातील जामनेरचा आहे. भाजपचा कार्यकर्ता आहे, गिरीश महाजनचा कार्यकर्ता आहे. त्याच्यावर देखील एक गुन्हा दाखल झाला आहे. प्रफुल्ल लोढानं गेल्या वर्षी गिरीश महाजन आणि रामेश्वर नाईक यांच्याविरोधात तक्रार दाखल केलेली आहे. स्थानिक पोलीस या प्रकरणाचा तपास करु शकणार नाहीत, यासाठी एसआयटी स्थापन करावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

प्रफुल लोढाचा जुना व्हिडीओ मंत्री गिरीश महाजन यांनी समोर आणलाय. त्यात प्रफुल लोढा याने म्हटले होते की, माझा मित्र स्वर्गीय निखिल भाऊ खडसे याची आत्महत्या झाली. परंतु मला शंका आहे की, त्याच्या व्यसनापाई एकनाथ खडसे यांची बदनामी होत होती. म्हणून या निखिल खडसेची आत्महत्या झाली की काही काळबेरं एकनाथ खडसेंनी केले, याची चौकशी जशी सुशांतसिंह राजपूतची सीबीआयने केली, तशी निखिल खडसेच्या मृत्यूची चौकशीची मागणी मी न्यायालय, मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते, शरद पवार, राष्ट्रपती, राज्यपाल, या सर्वांकडे करणार असल्याचे त्याने म्हटले होते.

# उल्हासनगर- विनयभंगाच्या आरोपीचा जेलमधून सुटताच उन्माद! पीडित तरुणीच्या घराबाहेर फटाके फोडले, ढोल वाचवून नाचला

दैनिक आपला विदर्भ

**उल्हासनगर/प्रतिनिधी :** उल्हासनगरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. विनयभंगाचा आरोप असलेल्या आरोपीने जेलमध्ये सुटताच पीडीत तरुणीच्या घराबाहेर फटाके फोडत व ढोलताशे वाजवल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला असून यानंतर उल्हासनगरात पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

उल्हासनगरच्या कॅम्प २ मध्ये रमाबाई टेकडी परिसरात २७ एप्रिलच्या रात्री हंशू बिपिन झा, रोहित झा, सोनमणी झा आणि बिट्टू यादव यांनी एका घराचा दरवाजा तोडून घरात घुसत घरातील दोन तरुणींना बाहेर खेचलं आणि त्यांच्या अंगावरील कपडे फाडून विनयभंग केला, असा आरोप होता. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत आरोपींना उल्हासनगर पोलिसांनी अटक केली होती.

या प्रकरणातील आरोपी दिवाकर यादवला १६ जुलैला जामीन मिळाला तर रोहित झा आरोपीला १७ जुलैला जामीन मंजूर केला. जेलमधून सुटका होताच दोघांचीही मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर आरोपी रोहित झाने पीडित तरुणींच्याच घरासमोर फटाके फोडत ढोल ताशे वाजवत सेलिब्रेशन करण्यात आलं. ही विकृती आली कुठून. गुन्हा केल्याची जराही लाज या आरोपींना वाटली नाही का ? असे अनेक सवाल उपस्थित होतायत.

दरम्यान, आरोपीच्या या सेलिब्रेशनचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांकडून आरोपी रोहित झावर पुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र आरोपी फरार झाला असून उल्हासनगर पोलीस त्याचा शोध घेतायत. पोलिसांनी कारवाई करत सदर आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

उल्हासनगर कॅम्प क्रमांक २ मधील रमाबाई टेकडी येथे २७ एप्रिलच्या रात्री दारूच्या नशेत झालेल्या वादातून एकाला लोखंडी तलवार आणि रॉडने मारहाण करण्यात आली होती. याप्रकरणी पोलिसांनी खुनाचा प्रयत्न आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या दिवाकर सह अन्य आरोपींवर गुन्हा दाखल केला होता. मात्र दिवाकर यादव याचा जामीन झाल्यावर फटाके फोडत मिरवणूक काढल्याचा सीसीटीव्ही सोशल मीडियावर वायरल झाला आहे

# मुंबईतील ६२ वर्षीय महिलेची ७ कोटी रुपयांची फसवणूक, शेअर मार्केटमध्ये जास्त परतावा मिळण्याच्या आमिषाला बळी

**मुंबई/प्रतिनिधी :** वांद्रे येथील उच्चभ्रू सोसायटीत राहणाऱ्या एका ६२ वर्षीय महिलेची ७ कोटी रुपयांपेक्षा जास्त फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शेअर बाजारात जास्त परतावा मिळण्याच्या आमिषाने या महिलेला फसवणूककर्त्यांनी बळी पाडले. नेमके काय आहे प्रकरण? जाणून घेऊया

सायबर फसवणूक करणाऱ्यांनी शेअर बाजारात जास्त परतावा मिळण्याच्या आमिषाने मुंबईतील ६२ वर्षीय महिलेची तब्बल ७.८८ कोटी रुपयांची फसवणूक केली आहे.पिढीत महिला वांद्रे परिसरात राहत असून ती गृहिणी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पश्चिम विभाग सायबर पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले की, गेल्या दोन महिन्यांत वांद्रे परिसरात राहणाऱ्या महिलेची फसवणूक करण्यासाठी, फसवणूक करणाऱ्यांनी स्वत:ला एका प्रतिष्ठित वित्त सेवा कंपनीचे प्रतिनिधी म्हणून आपली ओळख करून दिली. पीडितेने पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, तिला पहिल्यांदा एका अज्ञात नंबरवरून व्हॉट्सॲपवर मेसेज आला.

मेसेज पाठवणाऱ्या महिलेने स्वत:ची ओळख कंपनीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची सहाय्यक असल्याचा दावा केला. त्यानंतर शेअर गुंतवणुकीबद्दल संभाषण सुरू झाले. पीडितेला कंपनीच्या अधिकाऱ्याचा संपर्क क्रमांक आणि वेबसाइटची लिंक देण्यात आली. अधिकाऱ्याने सांगितले की, नंतर तिला एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आले आणि दुसऱ्या व्यक्तीशी ओळख करून देण्यात आली, ज्याने वित्तीय कंपनीशी संबंधित असल्याचा दावाही केला.

पोलिसांनी सांगितले की, महिलेच्या विनंतीवरून पीडितेने वेळोवेळी अनेक बँक खात्यांमध्ये एकूण ७८८७००० रुपये (७ कोटी अठ्ठ्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार) ट्रान्सफर केले. जेव्हा तिने तिचे पैसे काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिला अतिरिक्त १० टक्के रक्कम जमा करण्यास सांगण्यात आले. जेव्हा काहीतरी संशयास्पद वाटले तेव्हा महिलेने चौकशी करण्याचा निर्णय घेतला, ज्यामध्ये फसवणूक असल्याचे दिसून आले.

त्यानंतर महिलेने सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. सध्या पोलिसांनी संबंधित कलमांखाली अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे आणि या प्रकरणाचा सविस्तर तपास सुरू केला आहे. आरोपीला लवकरच अटक केली जाईल असा पोलिसांचा दावा आहे.

# मुख्यमंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे – शशिकांत शिंदे

**नवीमुंबई/प्रतिनिधी :** सरकार हतबल झाले आहे.मुख्यमंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. हनी ट्रॅपचा विषय निघाला तर, त्यावर कोणी बोलायला तयार नाही, स्पष्टीकरण दिले जात नाही. काही लोकांनी पुरावे दाखवण्याचा प्रयत्न केला तर, त्यांना अटक केली जाते. अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस आहे. त्यांना शुभेच्छा, मात्र काही मंत्र्यांमुळे यांची प्रतिमा मलिन होत आहे. कधी तरी निर्णय घेण्याचे धाडस दाखवावे. सूरज चव्हाणांवर कारवाई केली म्हणजे त्या प्रकाराला न्याय दिला. अशी भूमिका होत नाही.मी काही राजीनामा देणार नाही, अशा प्रकारे जर एखादा मंत्री बोलत असेल तर इतक्या धाडसाने जर ते असं बोलत असतील तर त्यांना वरिष्ठ पाठीशी घालतात का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. सरकारमधून मुख्यमंत्री पाठिशी घालतात. अशी शंका यायला लागली आहे. सरकारमधील मंत्री जर अशा प्रकारे भ्रष्टाचार करत असतील, त्यांच्यावर विविध आरोप असतील आणि जर सरकार यावर कारवाई करत नाही तर, सरकार टिकवण्यासाठी मुख्यमंत्री हतबल आहेत. टकले मिरवणूक म्हणजे महाराष्ट्रामध्ये कायद्याचा धाक राहिलेला नाही, भीती राहिलेली नाही, त्यामुळे अशा प्रकारच्या लोकांना पाठिंबा देणं म्हणजे पक्षांनेच त्यांचा उत्साह वाढवण्यासारखे आहे.अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना केली आहे.


## संक्षिप्त...

### हिम्मत असेल तर राजीनामा घेऊन दाखवच; रामदास कदम यांचं अनिल परब यांना आव्हान



**रत्नागिरी/प्रतिनिधी :** अनिल परब अर्धवट वकील असून योगेश कदम सभागृहात नसताना आरोप केले गेले, ३५ ची नोटीस न देताच मंत्र्यावर आरोप हेच पहिल्यांदा चुकीचे आहे. हिम्मत असेल तर, अनिल परब यांनी राजीनामा देऊन दाखवावाच असे मत माजीमंत्री रामदार कदम यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी माजीमंत्री कदम म्हणाले की,अनिल परब यांच्यावर हक्कभंग दाखल होणार आहे. योगेश कदम यांना राजकारणातून उध्वस्त करण्याचा पाप अनिल परब आणि उद्धव ठाकरे यांनी दापोलीत केले. अनिल परबानी मुख्यमंत्र्यांना भेटाव आणि जे काय आहे ते दाखववावे.हिम्मत असेल तर राजीनामा घेऊन दाखवच,असे आव्हान रामदास कदम यांनी अनिल परब यांना दिले आहे. आम्ही डान्सबार फोडणारे चालवणारे नाही. मंत्री झाल्यापासून योगेश कदमानी स्वतः डान्सबार बंद केलेत, म्हणून यांना हे सगळं खटकतंय. आम्ही लोकांनाचे संसार उध्वस्त करणारे नाहीत. संसार बसवणारे आहोत.कदम फॅमिला कसं बदनाम करता येईल, त्यांना कसं संपवता येईल याचा विडा उद्धव ठाकरेंनि उचलला आहे.असे मत माजीमंत्री रामदास कदम यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### मला व्हिडिओ स्किप करायला वेळ लागतो - माणिकराव कोकाटे



**नाशिक/प्रतिनिधी :** मी चौकशीसाठी मागणी केलेली आहे. चौकशी अंती सगळ बाहेर येईल.त्यात दोषी आढळले मी रमी खेळत होतो तर मी राजीनामा देईल. एका विषयावर एकदाच बोलावे त्यांना नीट उत्तर देता येत नाही. अधिवेशनात या अगोदर समजले नाही का ? विरोधकांच्या सर्व प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मी दिलेले आहेत. पत्ते उधळणे ॲक्टिव्हिटी म्हणून ते करत आहेत. ॲक्टिव्हिटी म्हणून लोकांना मीडियाला दाखवायचे आहे. पेपरला नाव छापून आणायचे आहे. आपल्या हातात काही राहिले नाही. म्हणून छोटा विषय मोठा करण्याचा प्रयत्न आहे. त्यांना काय करायचे आहे करू द्या, त्याने फरक पडत नाही. व्हिडिओ स्कीप तयार करायला मला वेळ लागतो त्यांना नसेल लागत ते माझ्या पेक्षा जास्त हुशार आहेत. ते जास्त हुशार असल्याने त्यांचा प्रॉब्लेम कमी आहे. मी कमी हुशार असल्याने मला प्रॉब्लेम जास्त आहेत.असे मतही यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केले.

### राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे द्यावयाचा असतो, राज्यपालांकडे नाही; आमदार जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषदे कोकाटेंवर टिका



**ठाणे/प्रतिनिधी :** माणिकराव कोकाटे हे रम्मी नाही तर बुद्धिबळ खेळत होते. हत्ती घोडा ते नसून किलावर, इस्पिक, चौकट हे होत. आमचा नजर दोष होता, महाराष्ट्राचा नजर दोष होता. राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे द्यावयाचा असतो, राज्यपालांकडे नाही. अशी टिका पत्रकार परिषदेत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माणिकराव कोकाटेंवर केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, विरोधक मानहानीचा खटला दाखल करणार आहेत. आम्ही मूर्ख आहोत ते बुद्धिबळ खेळत होते. ते पत्ते नव्हते खेळत ते बुद्धिबळाचा पट मांडून बसले होते. व्हिडिओ आला ना... खून कसा केला. मात्र खून केला ना? कोणी बघितला. टकले मिरवणूकीबाबत त्याला राष्ट्रपती पदक मिळाले पाहिजे होते.महाराष्ट्र लोकशाही मंदिर मध्ये ५ गुंड येतात. अनेक गुन्हांचा आरोपी शिस्त भग करतो, ५ जण येतात आणि एकाला अटक करतात. महाराष्ट्राला बट्टा लावणारा माणूस त्याचा सत्कार करावा, मुख्यमंत्र्यांनी कोकाटेंचे कान टोचले आहेत. मुख्यमंत्री अत्यंत चाणाक्ष आणि हुशार आहेत. असे मत यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

# उमरखेड आगाराची ढाणकी मार्ग ते आदिलाबाद बस चालू करा- पालकमंत्र्यांकडे केली मागणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी:** उमरखेड तालुक्यातील ढाणकी गाव हे सर्वात जास्त लोकसंख्या, व आजूबाजूला असलेल्या खेड्यामुळे सर्वात मोठा बाजारपेठ चा ठिकाण आहे. या गावाला मराठवाडा व तेलंगाणा सिमा आहे. त्यामुळे येथील लोकांना रोजगारा साठी व व्यापारीना खरेदी करण्यासाठी जवळ आहे. आदिलाबाद हे भारताच्या तेलंगणा राज्याच्या जिल्ह्याचे मुख्यालय आहे. हे कापसाच्या समृद्ध लागवडीसाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे आदिलाबादला व्हाइट गोल्ड सिटी असेही संबोधले जाते इथे मोठ मोठे जिनींग असल्यामुळे ढाणकी ते आदिलाबाद जवळच्या खेड्यातील लोक रोजगारा साठी तिकडे जात असतात. त्यामुळे उमरखेड आगाराची बस फेरी आदिलाबाद मार्ग ढाणकी उमरखेड ते टेंबूरधारा किनवट आंबाळी घाट या नित्यावर एक फेरी चालू केली तर विदर्भ मराठवाडा तेलंगाणा जोडणारा



जवळचा मार्ग असल्याने वेळ कमी लागून राज्य परिवहन महामंडळाची पैशाची बचत होऊन उत्पन्न वाढेल व तसेच प्रवाशांची गैरसोय होणार नाही.आदिवासी दुर्गम भागातुन तांडे वस्ती जुळणार यामुळे ही फेरी चालु करणे आवश्यक असल्याने उमरखेड आगाराची ढाणकी मार्ग ते आदिलाबाद बस चालू करा अश्या आशयाचे निवेदन शिवसेना ढाणकी शहर अध्यक्ष संजय सल्लेवाड , माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ आध्यक्ष शेख इरफान सचिव हिरासिंह चव्हाण, कार्याध्यक्ष नाथा पाटील ,यांनी यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांना दिले आहे

# लोणार तालुक्यात अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश्य पाऊस; भुमराळा गावातही पावसाचा कहर

## अनेक जमिनी खरडुन गेल्या तर विहीरी जमीनदोस्त झाल्या

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**भुमराळा** : दि.२२जुलै रोजीच्या सकाळी ३ ते ४ वाजेदरम्यान लोणार तालुक्यातील अनेक गावांत मुसळधार तर अनेक ठिकाणी ढग फुटी सदृश्य पाऊस पडला यामध्ये असंख्य शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून सदर नूकसानीचे त्वरीत पंचनामे करून नूकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी करीत आहे आज सकाळी भुमराळा सावरगाव तेली





देवानगर किनगाव जट्टू सह परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस पडला पडलेल्या या अवकाळी पावसामुळे भूमराळा गावातील शेतकरी अनिल मदन मुळे या अल्पभूधारक शेतकर्यांची विहिर जमीन उद्ध्वस्त होवून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून संतोष चौधरी , बबन चौधरी,यांच्या शेतातील कपाशी, सोयाबीन खरडुन गेली तसेच बबन चौधरी यांचे शेत खरडुन गेले असुन भुमराळा येथे शेकडो शेतकर्यांचे शेत खरडुन गेल्यामुळे लाखों रुपये चे नूकसान झाले आहेत त्यामुळे शासनाने या नूकसानीचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

## बुलढाणा आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** येथील आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृहात शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता ११ वी व त्यापुढील शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना वसतीगृहात प्रवेश दिला जाणार आहे.

वसतीगृहात निवासासोबतच शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत विद्यार्थीनींच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट डीबीटी प्रणालीद्वारे विविध प्रकारचे शैक्षणिक भत्ते प्रदान केले जातात. यामध्ये निर्वाह भत्ता, भोजन भत्ता, स्टेशनरी भत्ता, ड्रेस कोड भत्ता, शैक्षणिक सहल भत्ता तसेच अभ्यासक्रमानुसार इतर शैक्षणिक भत्त्यांचा समावेश आहे.

आवश्यक कागदपत्रे: अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र (व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी), शाळा सोडल्याचा दाखला, इयत्ता १० वीची गुणपत्रिका, बुलढाणा शहरातील कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, फिटनेस मेडिकल सर्टीफिकेट, उत्पन्नाचा दाखला (सन २०२४-२५), आधार कार्ड, आधार संलग्न बँक खाते पासबुक किंवा पोस्ट बँक पासबुक झेरॉक्स, रहिवासी दाखला, पासपोर्ट साईझ फोटो. अर्जामध्ये विद्यार्थिनीने स्वतःचा किंवा पालकांचा मोबाईल नंबर नमूद करावा, जो आधार आणि बँक खात्यासोबत लिंक असावा. अर्ज भरताना नाव आधार कार्डवरील नावाशी जुळणारे असणे आवश्यक आहे. बँक खाते सुरु असल्याची खात्री विद्यार्थिनीने स्वतः बँकेत जाऊन करून घ्यावी. सर्व आवश्यक कागदपत्रांची झेरॉक्स प्रत ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. इच्छुक विद्यार्थिनींनी https://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट (हार्डकॉपी) आवश्यक कागदपत्रांसह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष जमा करावी. अधिक माहितीसाठी आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह,राऊत मंगल कार्यालय, सर्व्हयुलर रोड, जिजामाता महाविद्यालयाजवळ, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करण्याची माजी आ. संजय रायमुलकर यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** आज सकाळी मेहकर लोणार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि ढगफुटी सदृश विनाशकारी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर क्षेत्र बाधित झाले असून पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शासकीय यंत्रणेकडून त्वरित नुकसानीचे पंचनामे तयार करण्याची मागणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी पालकमंत्री मकरंद पाटील यांचे कडे केले आहे. आज सकाळी दोन ते सहा वाजेपर्यंत विशेषतः लोणार तालुक्यात ढगफ ुटी सदृश अवकाळी पाऊस पडल्यामुळे नदी नाल्यांना मोठे पूर आले. अनेक ठिकाणी शेतांमध्ये तलावासारखे पाणी साचले यामुळे उगवून आलेल्या पिकाची तसेच पुरामुळे नदीकाठची शेती खरडून गेल्यामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरे पडली आहेत. नुकसानग्रस्त गावांची माहिती माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांना भ्रमणध्वनी वरून दिली शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी शासकीय यंत्रणेला नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश निर्गमित करण्याची विनंतीही त्यांनी केली.

अशा प्रकारचे आदेश तातडीने देण्याची व्यवस्था करण्यात येत असल्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके, लोणारचे तहसीलदार भूषण पाटील यांच्याशीही संजय रायमुलकर यांनी सविस्तर चर्चा करून झालेले नुकसान खूप मोठे आहे व नुकसानग्रस्तांना तातडीने दिलासा मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे पंचनामे करून सर्वेक्षणाची माहिती वरिष्ठ पातळीवर यथाशिघ्र पाठविण्याची



सूचनाही त्यांनी केली. लोणार तालुक्यातील बोरखेडी येथील सिंचन तलाव पूर्ण भरून जमीन संपादन न केलेल्या जमिनीतूनही मोठ्या प्रमाणात पुरासारखे पाणी वाहिल्यामुळे खूप मोठे नुकसान झालेले आहे. सदर सिंचन तलावाचे पाणी ज्या ज्या शेतांमधून वाहिले आहे व नुकसान झाले आहे ते एक सर्व क्षेत्र तलावासाठी संपादित समजून शेतकऱ्यांना त्याबाबतचा मोबदला व नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी ही संजय रायमुलकर यांनी केली आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त बिबी येथे वृक्षारोपण



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप


**बिबी :** लोणार तालुक्यातील बिबी गावामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बिबी येथील भाजपा पदाधिकार्यांनी बिबी शहरातील हिंदू स्मशानभूमी मध्ये दोनशे वृक्षांची लागवड करुन फडणवीस यांचा वाढदिवस साजरा केला भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप तथा व्यापारी आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष गोपाल काबरा यांच्या नेतृत्वात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला यावेळी भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षांच्या संगोपनाची सर्व जबाबदारी घेत वृक्षांचे रक्षण करण्याची जबाबदारी पण स्वीकारली यावेळी बाळासाहेब कुलकर्णी, रमेश आंधळे, अमोल मुळे,प्रविण धाईत, भागवत आटोळे, राम डुकरे,सागर मुर्तरकर सह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

## नरसिंह मंदिरात होणार विष्णुसहस्त्रनामाचे अखंड पाठ

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकरच्या प्रसिद्ध नरसिंह मंदिरात श्रावणमासाच्या निमित्ताने विष्णुसहस्त्रनाम या स्तोत्राचे रात्रंदिवस अखंड पाठ होणार आहेत. २६ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत श्री नरसिंह संस्थानच्या वतीने हे पाठ आयोजित करण्यात आले आहेत.

जगातील अकरापैकी सहावे अशी ओळख असलेल्या मेहकरच्या प्राचीन नरसिंह मंदिरात विष्णुसहस्त्रनाम या स्तोत्राच्या पठणाचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे दरवर्षी श्रावण महिन्यातल्या पहिल्या शनिवारपासून दुसऱ्या शनिवारपर्यंत या मंदिरात दिवसभर महिला भाविक आणि रात्रभर पुरुष भाविक या



स्तोत्राचे अखंड पाठ करतात. एक मिनिटाचाही खंड पडू न देता आठवडाभर रात्रंदिवस या स्तोत्राचे पाठ करणे, हा आध्यात्मिक क्षेत्रातला एक विक्रम असून तो इतरत्र कुठेही होताना दिसत नाही. नरसिंह संस्थानचे अध्यक्ष सद्गुरु ॲड. रंगनाथ महाराज पितळे यांच्या प्रेरणेने दरवर्षी हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडत आहे. गेल्यावर्षी यामध्ये २५० भाविक प्रत्यक्ष सहभागी झाले होते. यावर्षी यापेक्षा अधिक भाविकांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री नरसिंह संस्थानने केले आहे.

**अकरा हजार पाठांचे लक्ष्य**

गेल्यावर्षी या उपक्रमात सव्वादहा हजार पाठ झाले होते. मात्र अकरा हजार पाठांचा टप्पा गाठल्या गेला नव्हता. यावर्षी तो टप्पा गाठण्याचे लक्ष्य सद्गुरु पितळे महाराजांनी आमच्यापुढे ठेवले आहे. ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू !

**–आशिष उमाळकर**

**(विश्वस्त, श्री नरसिंह संस्थान)**

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या मुलाचे पालकत्व स्वीकारण्याचे मुख्यमंत्र्यांना विसर

### आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीचा शिवणी येथे अन्नत्याग आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा तालुक्यातील शिवणी येथील राज्य शासनाचा आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी १३ मार्च २०२५ रोजी शेतात आत्महत्या करीत शेतकऱ्यांसाठी बलिदान दिले होते. याला चार महिने उलटूनही कोणत्याच मागणीची पूर्तता झाली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवसी यांनी त्यांच्या मुलांचे पालकत्व स्वीकारण्याचे सभागृहात आश्वासन दिले होते. परंतु, तेही पूर्ण करण्यात आले नाही.त्यामुळे किमान मुलांचे पालकत्व तरी राज्य सरकारने स्वीकारावे, यासाठी आत्महत्याग्रस्त शेतकरी कैलास नागरे यांची पत्नी स्वाती कैलास नागरे यांनी शिवणी येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले.

या उपोषणास उद्ध्व बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या प्रवक्ता अड्. जयश्रीताई शेळके यांनी भेट देऊन सरकारवर टिका केली आहे. शिवणी आरमाळ येथील राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी यांनी आत्महत्या केली होती. तर सरकाने सभागहात कैलास नागरे यांच्या मुलांचे पालकत्व स्वीकारण्याचा शब्द दिला होता. परंतु, आजरोजी कोणत्याही मागण्या पूऱ्ण झाल्या नसल्याने आत्महत्याग्रस्त कैलास नागरे यांच्या पत्नीने शिवणी आरमार येथे बेमुदत उपोषण सुरू केले आहे. सदर उपोषणास उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसनेच्या प्रवक्त्या अड्.




जयश्रीताई शेळके यांनी उपोषणास भेट देऊन राज्य सरकारवर टिका केली आहे.

यावेळी त्या म्हणाल्या की, कैलास नागरे यांना आत्महत्या करून चार महिन्याचा कालावधी झाला आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आपल्या जिवाचे बलीदान दिले आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सभागृहात शब्द देऊन मुलांचे पालकत्व स्वीकारणार असल्याचे सांगितले होते.मात्र आजरोजी मुख्यमंत्र्यांना आपल्या शब्दाचा विसर पडला आहे.त्यामुळे कैलास नागरे यांची पत्नी स्वाती नागरेवर आमरण अन्नत्याग आंदोलन करण्याची वेळ आली आहे.ही बाब राज्यासाठी शरमेची आहे. त्यांना न्याय दिला पाहिजे. १४ गावासाठी पाणी पुरवठा खडकपूर्णा प्रकल्पातून पुरविण्याची मागणी पूऱ्ण झाली नाही. तर, आता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नीवरही अन्नत्याग आंदोलन करण्याची वेळ आली आहे. ही अत्यंत शरमेची बाब आहे. हे सरकार निष्ठूर आहे. याची प्रचिती बुलढाला जिल्ह्याला आणि राज्याला आली आहे. असे म्हणत उद्ध्व बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या प्रवक्त्या अड्. जयश्रीताई शेळके यांनी सरकारवर टिका केली.

## विविध वृत्त...

### स्टँड अप इंडिया योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजकांसाठी केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत स्टँड अप इंडिया योजना सुरु करण्यात आली आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी दि. ३० जुलै २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन समाजकल्याण कार्यालयाचे सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले आहे.

स्टँड अप इंडिया योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजकांना उद्योग आधार नोंदणी पत्र, जात प्रमाणपत्र, बॅंकेचे कर्ज मंजुरीचे पत्र आदी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. या योजनेत सवलतीस पात्र नवउद्योजकांनी १० टक्के स्वहिस्सा भरणा करणे आवश्यक आहे. बँकेने अर्जदारास स्टॅंड अप इंडिया योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजक लाभार्थ्यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे कागदपत्रासह अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या बद्दल अपमानास्पद पोस्ट करणाऱ्यावर कठोरात कठोर कार्यवाई करा; जय मल्हार संघटना ढाणकी यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी:** समाजात मोठा आदर आणि श्रद्धा असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रमातेबद्दल. सुनील गोपाळराव उभे या इसमाने आपल्या फेसबुक अकाउंटवरून त्यांच्या संदर्भात अत्यंत अश्लील व अपमानास्पद भाषेत बदनामीकारक अपशब्द लिहिल्यामुळे समाजात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे. अशा प्रकारचे वक्तव्य केवळ कायद्याचे उल्लंघन करणारे नसून, सामाजिक शांततेस आणि एकात्मतेस देखील धोका पोहोचवणारे असून संबधित फेसबुक पोस्ट/कमेंटची चौकशी करून, आवश्यक त्या कायदेशीर तरतुदींनुसार समाजकंटक सुनील गोपाळराव उभे यांच्याविरुद्ध कठोरात कठोर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात कोणीही अशा प्रकारची कृत्य करण्यास धजावणार नाही.या प्रकाची मागणी जय मल्हार संघटना ढाणकी यांनी ठाणेदार पांडुरंग शिंदे पोलीस स्टेशन, बिटरगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### वाल्मिक कराडच्या दोष मुक्तीच्या अर्जावर उच्च न्यायालयात दाद मागणार : विकास खाडे वाल्मीक कराडचे वकील



**बीड/प्रतिनिधी :** वाल्मिक कराड याच्या दोष मुक्तीच्या अर्जावर सुनावणी झाली. या सुनावणी दरम्यान न्यायालयाने अर्ज फेटाळला आहे.यासंदर्भात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे कराडचे वकील विकास खाडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. यावेळी ते म्हणाले की, वाल्मिक कराडचा जामीन अर्ज देखील न्यायालयात सादर करण्यात आला आहे. सर्व आरोपींच्या वकिलांकडून दोष मुक्तीसाठी अर्ज दाखल करण्यात आला आहे. संपत्ती जप्तीबाबत दोन्ही पक्षाचा युक्तिवाद झाला आहे. जे बँक खाते गोठवण्यात आले. त्यावरील निर्बंध उठविण्याबाबत बाजू मांडली आहे.याबाबत सुनावणी झाली पुढील तारखेला याबाबत न्यायालय निर्णय देईल.अशी माहिती वाल्मिक कराडचे वकीत विकास खाडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.